International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 5 | June - 2015 Available online at www.isrj.org

# आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावरील कर्ज व शेतकऱ्यांच्या आत्महत्या



**रामेश्वर एम्. मोरे**
(समाजशास्त्र विभाग) एस.बी.पी. कॉलेज, मंद्रुप, ता.द. सोलापूर, जि. सोलापूर. (महाराष्ट्र)

Short Profile :
Rameshwar M. More is is working as a Assistant Professor at Department of Sociology in S.B.P. College, Mandrup, Tal. South Solapur, Dist Solapur. He has completed M.A.B.Ed. NET. M.Phil.Ph.D. (Ongoing).



**सारांश :-**

शेतकऱ्यांचा जन्म कर्जात होतो, तो कर्जात वाढतो व त्याचा मृत्युदेखील कर्जातच होतो. हे विधान आज भारतीय शेतकऱ्याना तंतोतंत लागू होत आहे. सद्यस्थितीत शेतकरी अत्यंत दयनीय अवस्थेत जीवन जगत आहेत. शेतीतील उत्पन्नातून उदरनिर्वाहाचा खर्चदेखील भागत नाही, त्यामुळे त्यांना वारंवार कर्ज काढावे लागते. परंतु बँका प्रामुख्याने शेतीखर्चासाठी कर्ज देतात, त्यामुळे ते सावकार, नातेवाईक यांच्याकडून अधिक व्याजदराने इतर कामासाठी कर्ज काढत आहे. परिणामी कर्जबाजारीपणा अधिकच वाढत चालला आहे. नापिकी, अत्यल्प उत्पादन तसेच उत्पादनाला मिळणाऱ्या कमी भावामुळे ते कर्जाची परतफेड देखील करु शकत नाहीत. त्यामुळे त्यांची छळवणूक होते. शेवटी ते कर्जाला कंटाळून आत्महत्येचा मार्ग अवलंबत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावरील कर्ज, कर्जाचे स्त्रोत, कर्जाची कारणे व कर्ज परतफेड इत्यादी बाबीसंबंधी अध्ययन करण्यात आले आहे.

**Article Indexed in :**
DOAJ Google Scholar DRJI
BASE EBSCO Open J-Gate

## प्रस्तावना :-

वर्तमानस्थितीत भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येने गंभीर स्वरुप धारण केले आहे. भारतात प्रामुख्याने महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश व छत्तीसगढ या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. म्हणून या राज्यांना पी. साईनाथ यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंदर्भात "Special Elimation Zone" असे संबोधले आहे. महाराष्ट्रात सर्वात अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत म्हणून महाराष्ट्राला "शेतकऱ्यांची स्मशानभूमी" Graveyard of farmers असे संबोधले आहे. महाराष्ट्रात विदर्भ व मराठवाड्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मराठवाड्यात उस्मानाबाद जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तसेच सद्यस्थितीतही उस्मानाबाद जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र चालूच आहे. भारतातील विविध प्रदेशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे अध्ययन विविध तज्ञांनी केले आहे. त्यांच्या अध्ययनातून कर्जबाजारीपणा हा घटक शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरला आहे असे आढळून आले आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे उस्मानाबाद जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावरील कर्ज व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यात काही संबंध आहे का याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## उद्देश :-

आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावरील कर्ज व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यात काही संबंध आहे का याचा शोध घेणे.

## गृहितकृत्य :-

आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावर असलेले कर्ज बहुतांश शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरले आहे.

## संशोधन पध्दती :-

प्रस्तुत अध्ययन हे वैज्ञानिक पध्दतीच्या आधारे केले आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी एमिल डरखिमच्या आत्महत्या सिध्दांताचा आधार घेतला आहे. तसेच या अध्ययनासाठी वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला आहे.

## नमुना निवड :-

प्रस्तुत अध्ययनासाठी साधा यादृच्छिक नमुना निवडीचा उपयोग करुन त्यातील लॉटरी पध्दतीच्या आधारे उस्मानाबाद जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या १०० शेतकऱ्यांच्या कुटुंबाची निवड नमुना म्हणून केली आहे.

## तथ्य संकलन :-

प्रस्तुत अध्ययनात प्राथमिक तथ्य संकलनासाठी अनुसूची व निरीक्षण या तंत्राचा उपयोग केला आहे. तसेच द्वितीयक स्त्रोतात संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, संशोधन संस्थाचे अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादींचा आधार घेतला आहे.

## उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या :-

उस्मानाबाद जिल्ह्यात ०१.०४.२००६ ते ३१.०३.२०१२ या कालावधीत २१८ शेतकऱ्यांनी आत्महत्या ल्या आहेत. त्याचे वार्षिक प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

### उस्मानाबाद जिल्ह्यातील वर्षनिहाय शेतकरी आत्महत्या दर्शविणारा तक्ता

| वर्ष | शेतकरी आत्महत्यांची संख्या |
|---|---|
| २००६-०७ | ३५ |
| २००७-०८ | ५३ |
| २००८-०९ | ४६ |
| २००९-१० | २९ |
| २०१०-११ | ३१ |
| २०११-१२ | २४ |
| **एकूण** | **२१८** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वाधिक ५३ शेतकरी आत्महत्या या २००७-०८ या वर्षात झालेल्या आहेत. तर सर्वात कमी २४ शेतकरी आत्महत्या या २०११-१२ या वर्षात झालेल्या आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी विविध घटक जबाबदार आहेत. परंतु प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे केवळ आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावरील कर्ज व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यातील संबंधाचे अध्ययन करावयाचे असल्यामुळे आत्महत्येपूर्वी आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावर कर्ज होते का व असेल तर किती होते याचे अध्ययन केले तेव्हा पुढीलप्रमाणे तथ्ये निदर्शनास आली.

**आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावर असलेल्या कर्जासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | □र्ज | □टुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५० हजारापर्यंत | २६ | २६% |
| २ | ५० हजार ते १ लाख | ३३ | ३३% |
| ३ | १ लाख ते २ लाख | १७ | १७% |
| ४ | २ लाख ते ५ लाख | १४ | १४% |
| ५ | ५ लाखापेक्षा जास्त | ०३ | ०३% |
| ६ | □र्ज नसणारे | ०७ | ०७% |
| | **एकूण** | **१००** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबापैकी ९३% कुटुंबावर कर्ज होते तर केवळ ०७% कुटुंबावर कर्ज नव्हते. कर्जाच्या रकमेनुसार पाहिले असता ५० हजारापर्यंत कर्ज असणारे २६%, ५० हजार ते १ लाखापर्यंत कर्ज असणारे ३३%, १ लाख ते २ लाखापर्यंत कर्ज असणारे १७%, २ लाख ते ५ लाखापर्यंत कर्ज असणारे १४%, ५ लाखापेक्षा जास्त कर्ज असणारे ०३% कुटुंब होते तर ७% कुटुंब कर्ज नसणारे होते.

यावरुन हे स्पष्ट होते की, सामान्यपणे १ लाखापर्यंत कर्ज असणारे बहुतांश कुटुंब होते. परंतु या कुटुंबाचे उत्पन्नच कमी असल्यामुळे त्यांच्यासाठी एवढेच कर्ज म्हणजे खूप होते. त्याचबरोबर १ लाख ते २ लाख तसेच २ लाख ते ५ लाख पर्यंत कर्ज असणारे देखील अनेक कुटुंब होते. तर ५ लाखापेक्षा जास्त कर्ज

असणारे कुटुंब मात्र कमी होते. जे मोठे शेतकरी आहेत अशांकडेच हे अधिक कर्ज होते. थोडक्यात, आत्महत्या केलेल्या बहुतांश शेतकऱ्यांच्या कुटुंबावर कर्ज होते. हे कर्ज त्यांच्या ऐपतीपेक्षा अधिक होते. त्यामुळे या कर्जाची परतफेड करणे हा एक मोठा प्रश्न आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांसमोर होता.

### □र्जाचे स्त्रोत :-

हे कर्ज कोणाकडून घेतले याचे अध्ययन केले तेव्हा पुढीलप्रमाणे तथ्ये प्राप्त झाली.

### १) बँ□ :

आत्महत्या केलेल्या ६६% शेतकऱ्यांच्या कुटुंबांनी हे कर्ज बँकेकडून घेतले होते. बँकेचे व्याजदर कमी होते परंतु बँकेने पुरेसा □र्जपुरवठा केला नव्हता. त्यामुळे बँकेसोबतच इतरांकडून या कुटुंबांनी कर्ज घेतले होते.

### २) साव□ार :-

आत्महत्या केलेल्या ५५% शेतकऱ्यांच्या कुटुंबांनी सावकारांचे कर्ज घेतले होते. या कर्जाचा व्याजदर अधिक होता. परंतु सावकार बँकेपेक्षा लवकर कर्ज देत असल्यामुळे बहुतांश कुटुंबांनी सावकारांचे कर्ज घेतले होते. सावकाराच्या कर्जाचा व्याजदर अधिक असल्यामुळे या कुटुंबाच्या कर्जबाजारीपणात वाढ होत गेली.

### ३)नातेवाईक :-

आत्महत्या केलेल्या ३७% शेतकऱ्यांच्या कुटुंबांनी नातेवाईकांकडूनही कर्ज घेतले होते. नातेवाईकांनी देखील अधिक व्याजदर आकारुन हे कर्ज दिले होते. त्यामुळे या कुटुंबाच्या कर्जबाजारीपणात वाढ झाली होती.

### ४) सोसायटी :-

आत्महत्या केलेल्या ३०% शेतकऱ्यांच्या कुटुंबांनी सोसायटीचे कर्ज घेतले होते. सोसायटीचा व्याजदर कमी होता, परंतु सोसायटी कमी प्रमाणात कर्ज देत होती. त्यामुळे या कुटुंबांना इतरांकडून कर्ज घ्यावे लागत होते.

यावरुन हे स्पष्ट होते की, एकाच कुटुंबाने विविध स्त्रोताकडून कर्ज घेतले होते. बँक, सोसायटी सोबतच बहुतांश कुटुंबांनी सावकार व नातेवाईकांकडून कर्ज घेतले होते. परंतु सावकार व नातेवाईकांचा व्याजदर अधिक असल्याने कर्जबाजारीपणा वाढतच गेला.

### र्जाची कारणे :-

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांनी हे कर्ज प्रामुख्याने कोणत्या कारणासाठी घेतले होते याचे अध्ययन केले तेव्हा पुढीलप्रमाणे तथ्ये निदर्शनास आली.

### १) शेतीखर्च :-

आत्महत्या केलेल्या बहुतांश शेतकऱ्यांच्या कुटुंबांनी शेतीखर्चासाठी हे कर्ज घेतले होते. शेतीखर्चात पेरणीसाठी खते, बि-बियाणे खरेदी तसेच फवारणीसाठी किटकनाशके खरेदी इत्यादींसाठी कर्ज घेतले होते तर काही कुटुंबांनी विहीर, कुपनलिका, पाईपलाईन इत्यादींसाठी कर्ज घेतले होते.

### २) घरखर्च :-

शेतकऱ्यांकडे वर्षभर सातत्याने पैसा येत नाही. केवळ सुगीच्या वेळी धान्य विकले की पैसे येतात व ते पैसे अगोदरची कर्जे फेडण्यात संपतात. त्यामुळे बहुतांश कुटुंबांनी घरखर्चासाठी देखील कर्ज घेतले होते.

### ३) मुलीचा विवाह :-

सद्यस्थितीत हुंड्याशिवाय विवाह हे अपवादानेच होतात. बहुतांश पालकांना मोठ्या प्रमाणात मुलीच्या विवाहासाठी हुंडा द्यावा लागतो. आज हजाराऐवजी हुंडा लाखात बोलला जात आहे. हुंड्यासोबतच विवाहात इतर करणीधरणीदेखील मोठ्या प्रमाणात करावी लागत आहे. त्यामुळे एवढे पैसे कोणत्याही शेतकऱ्यांकडे नसतात. त्यामुळे बहुतांश कुटुंबांनी आपल्या मुलीच्या विवाहासाठी कर्ज काढले होते.

### ४) मुलांचे शिक्षण :-

वर्तमानस्थितीत शिक्षणाचा खर्चदेखील खूप वाढला आहे. परंतु शेतकऱ्यांकडे मुलांच्या गरजेवेळी पैसे नसतात. त्यामुळे बहुतांश वेळा कर्ज काढून मुलांच्या शिक्षणाचा खर्च केला जातो. थोडक्यात, मुलांच्या शिक्षणासाठी देखील काही प्रमाणात अनेक कुटुंबांनी कर्ज काढले होते.

### ५) इतर कारणे :-

आजारपणावरील खर्च, राजकारणातील सक्रीय सहभाग व निवडणुकीतील उमेदवारी, व्यसन इत्यादी विविध कारणांसाठी देखील काही कुटुंबानी कर्ज काढले होते.

थोडक्यात, शेतीखर्च, घरखर्च, मुलींचे विवाह, मुलांचे शिक्षण इत्यादी प्रमुख कारणासाठी हे कर्ज घेतले होते.

### कर्ज परतफेड :-

कर्जाची परतफेड ही वेळेवर झाली तर व्याजदेखील कमी जाते तसेच व्यक्तीची एक पत राहते. म्हणून या कुटुंबाद्वारे कर्ज परतफेड वेळेवर होत होती का याचे अध्ययन केले असता ११% कुटुंबाद्वारे कर्ज परतफेड वेळेवर होत होती तर ८२% कुटुंबाद्वारे कर्ज परतफेड वेळेवर होत नव्हती तर ७% कुटुंबावर कर्ज नसल्यामुळे त्यांच्यासाठी हे अध्ययन लागू नव्हते. कर्ज परतफेड न होण्याची कारणे पाहिले असता, वारंवार होणारी नापिकी, अत्यल्प उत्पादन आणि उत्पादनाला मिळणारा कमी भाव तसेच शेतीखर्च व घर खर्चात झालेली वाढ इत्यादी होत. कर्ज परतफेड वेळेवर न झाल्यामुळे बहुतांश कुटुंबाची छळवणूक देखील झाली होती. ही छळवणूक शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरली आहे.

### निष्कर्ष :-

वरील अध्ययनावरुन हे स्पष्ट होते की, आत्महत्येपूर्वी आत्महत्या केलेल्या बहुतांश शेतकरी कुटुंबावर कर्ज होते. हे कर्ज प्रामुख्याने शेतीखर्च, घरखर्च, मुलीचा विवाह, मुलांचे शिक्षण, आजारपणावरील खर्च इत्यादी कारणांसाठी घेतले होते. हे कर्ज प्रामुख्याने बँक, सावकार, नातेवाईक, सोसायटी इत्यादींकडून घेतले होते. परंतु सावकार व नातेवाईकांचा व्याजदर अधिक असल्यामुळे कर्जबाजारीपणात वाढ झाली होती. त्याचबरोबर नापिकी, अत्यल्प उत्पादन व उत्पादनाला मिळणारा कमी भाव, शेती खर्च व घरखर्चात झालेल्या वाढीमुळे बहुतांश कुटुंबाद्वारे या कर्जाची परतफेड वेळेवर होत नव्हती. त्यामुळे देखील व्याजाचे प्रमाण वाढून कर्जबाजारीपणात वाढ झाली होती. कर्जाची परतफेड वेळेवर न झाल्यामुळे देखील बहुतांश कुटुंबातील लोकांची छळवणूकदेखील झाली होती. ही छळवणूक देखील काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरली आहे. थोडक्यात, आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबावरील वाढलेले कर्ज व कर्ज परतफेड वेळेवर होत नसल्यामुळे झालेली छळवणूक बहुतांश शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरली आहे.

## शिफारशी :-

प्रस्तुत अध्ययनावरुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी काही शिफारशी केल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे-

१) बहुतांश शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसाठी कर्जबाजारीपणा हा घटक कारणीभूत ठरला आहे. म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे.

२) शेतकऱ्यांचे व्याजाच्या रुपाने शोषण करणाऱ्या सावकार व नातेवाईकांवर कडक कारवाई करावी.

३) शेतकऱ्यांना शेतीखर्चासोबतच मुलीचा विवाह, मुलाचे शिक्षण, घरखर्च इत्यादी विविध कारणासाठी त्वरीत कर्ज द्यावे.

४) शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव द्यावा.

## संदर्भ सूची :-

१) लांजेवार नरेंद्र (२००७), संपादित पुस्तक "शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय", सुमेरु प्रकाशन, डोंबिवली.

२) वानखडे चंद्रकांत (२००७), एका साध्या सत्यासाठी, परिसर प्रकाशन, अंबाजोगाई.

३) नाईकवाडे अशोक (२००८), संपादित पुस्तक "शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंता आणि चिंतन", किर्ती प्रकाशन, औरंगाबाद.

४) ढोबळे विष्णू (२००९), शेतकऱ्यांच्या आत्महत्या- जागतिकीकरणातील शोकांतिका, सुगावा प्रकाशन, पुणे.

५) P. Sainath (२००७, २०१०), Maharashtra : The Graveyard of farmers, The Hindu, १४ Nov. २००७, farmer Suicides : a १२ year saga, The Hindu, २५ Jan २०१०.

६) Dandekar Ajay & other (२००५), Causes of farmer Suicides in Maharashtra : An Enquiry.

७) P. Satish (२००६), 'Institutional Credit, Indebtedness and Suicides in Punjab', Economical and Political Weekly, Vol. XLI NO. XVI, P.P. १५५३-१५५८.

८) स□ाळ वृत्तपत्र समूह (२००६), शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक शोध ! सकाळ अहवाल, ३ एप्रिल २००६.

९) □ुरुलकर आर. पी. (२००६), मराठवाड्यातील शेती व शेतकऱ्यांच्या आत्महत्या, समाजप्रबोधन पत्रिका, जानेवारी ते मार्च २००७.

१०) जाधव नरेंद्र (२००८), शेतकरी आत्महत्या आणि कृषीक्षेत्रापुढील आव्हाने, कर्जमाफी आणि समग्र महाराष्ट्र समतोल कृषीविकास कृतियोजना अहवाल, २७ जुलै २००८.